# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र. १६०** **दिनांक १५/०६/२०२१**

## पुनमसागर येथून एसेंट कार चोरी करणा-या ३ जणांना नयानगर पोलीसांनी केली अटक

दि.०३/०६/२०२१ रोजी रोजी फिर्यादी श्री. प्रभाकर रामतिर्थ पांडे रा. ३०१, जी विंग, ओम साई इन्लेव्ह, पुनमसागर मिरारोड पुर्व यांनी तक्रार दिली की, दिनांक ३०/०५/२०२१ रोजी त्यांनी दुपारी १५.०० ते दि.०२/०६/२०२१ रोजी १६.०० वा. पावेतो मिरारोड पुनमसागर, स्वप्नदिप बिल्डींग समोरील रोडलगत पार्क केलेली होंडाई असेंन्ट कार क्र. MH-04/HN-3904 किंमत रुपये-५०,०००/- ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारिवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे गु. रजि .क्र. ३४१/२०२१ कलम ३७९ भा.द.वी. प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मा. वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने नयानगर पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवून तांत्रिक बाबींच्या मदतीने नमुदचा गुन्हा करणेकरीता वापरलेली इनोव्हा कार क्र. MH-04/CJ 9453 ही तात्काळ निष्पन्न करुन तपास केला व आरोपी १) मो. इरफान अब्दुल रेहमान-३० वर्षे रा. २११/२१२ ममता अपार्टमेंट, फेमस हॉटेल जवळ, गेबी नगर, भिवंडी, २) नावेद मो. यासीन-३८ वर्षे, रा.रु.नं.३०२, नवीन सुंदर महल, शिवार गार्डन, मिरारोड पुर्व, ३) सर्फराज मो. यासीन शेख-३४ वर्षे रा. रु.नं. ००३, पाली विलेज, वजीर चाळ, सी फुडच्या पाठीमागे, उत्तन, भाईदर यांना दि.१४/०६/२०२१ रोजी अटक केली असून त्यांचेकडून गुन्हयातील चोरुन नेलेली होंडाई असेन्ट कार क्र.- MH-04/HN-3904 व गुन्हयात वापरलेली इनोव्हा कार क्र.MH-04/CJ 9453, रुपये-५०,००० किंमतीची दोन वाहने जप्त करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.हवा./ओमप्रकाश पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उपायुक्त परि १, डॉ. शशिकांत भोसले सहा पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली श्री कैलास बर्वे व.पो.नि., श्री दिलीप साळुंखे पो.नि. (गुन्हे), पोउनि. आशुतोष चव्हाण, पोउनि सुपनर पो.हवा. पाटील, पो.ना. शकील पठाण, पोना संधु, पो.शि. गवारी, पोशि सचिन जाधव अशांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढिल तपास पो.हवा. श्री ओमप्रकाश पाटील हे करीत आहे.

--------oooooo-------